.. Shri Pancharatna Haripatha ..

॥ श्री पंचरत्न हरिपाठ ॥

१ श्रीज्ञानेश्वरमहाराजकृत हरिपाठाचे अभंग

॥ श्री गणेशाय नमः ॥

१

देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी । तेणें मुक्ति चारी साधियेल्या ॥१॥
हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा । पुण्याची गणना कोण करी ॥२॥
असोनि संसारीं जिव्हे वेगु करी । वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ॥३॥
ज्ञानदेव म्हणे व्यासाचिया खुणा । द्वारकेचा राणा पांडवां घरीं ॥४॥

२

चहूं वेदीं जाण षट्शास्त्रीं कारण । अठराहीं पुराणें हरीसी गाती ॥१॥
मंथुनी नवनीता तैसें घे अनंता । वायां व्यर्थ कथा सांडी मार्ग ॥२॥
एक हरि आत्मा जीवशिव सम । वायां दुर्गमी न घालीं मन ॥३॥
ज्ञानदेवा पाठ हरि हा वैकुंठ । भरला घनदाट हरि दिसे ॥४॥

३

त्रिगुण असार निर्गुण हें सार । सारासार विचार हरिपाठ ॥१॥
सगुण निर्गुण गुणांचें अगुण । हरिविणें मत व्यर्थ जाय ॥२॥
अव्यक्त निराकार राहीं ज्या आकार । जेथुनी चराचर त्यासी भजें ॥३॥
ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं । अनंत जन्मांनीं पुण्य होय ॥४

४

भावेंवीण भक्ति भक्तिवीण मुक्ति । बळेंवीण शक्ति बोलूं नये ॥१॥
कैसेनि दैवत प्रसन्न त्वरित । उगा राहें निवांत शिणसी वायां ॥१॥
सायासें करिसी प्रपञ्च दिननिशीं । हरिसी न भजसी कोण्या गुणे ॥३॥
ज्ञानदेव म्हणे हरिजप करणें । तुटेल धरणें प्रपंचाचें ॥४॥

५

योग याग विधी येणें नोहे सिद्धि । वायांचि उपाधि दंभधर्म ॥१॥
भावेंवीण देव न कळे निःसंदेह । गुरुवीण अनुभव कैसा कळे ॥२॥
तपेवीण दैवत दिधल्यावीण प्राप्त । गुजेवीण हित कोण सांगे ॥३॥
ज्ञानदेव मार्ग दृष्टांताची मात । साधूचे संगती तरुणोपाय ॥४॥

६

साधुबोध झाला तो नुरोनियां ठेला । ठायींच मुराला अनुभवें ॥१॥
कापुराची वाती उजळली ज्योती । ठायींच समाप्ती झाली जैसी ॥२॥
मोक्षरेखें आला भाग्ये विनटला । साधूचा अंकिला हरिभक्त ॥३॥
ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनीं । हरि दिसे जनीं आत्मतत्त्वीं ॥४॥

७

पर्वताप्रमाणें पातक करणें । वज्रलेप होणें अभक्तांसी ॥१॥
नाहीं ज्यांसी भक्ति ते पतित अभक्त । हरीसी न भजत दैवहत ॥२॥
अनंत वाचाळ बरळती बरळ । त्यां कैंचा दयाळ पावे हरी ॥३॥
ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान । सर्वांघटीं पूर्ण एक नांदे ॥४॥

८

संतांचे संगती मनोमार्गगती । आकळावा श्रीपति येणें पंथें ॥१॥
रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा । आत्मा जो शिवाचा राम जप ॥२॥
एकतत्त्वी नाम साधिती साधन । द्वैताचें बंधन न बाधिजे ॥३॥
नामामृत गोडी वैष्णवां लाधली । योगियां साधली जीवनकळा ॥४॥
सत्वर उच्चार प्रल्हादी बिंबला । उद्धवा लाधला कृष्णदाता ॥५॥
ज्ञानदेव म्हणे नाम हें सुलभ । सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे ॥६॥

९

विष्णुविणें जप व्यर्थ त्याचें ज्ञान । रामकृष्णीं मन नाहीं ज्याचे ॥१॥
उपजोनी करंटा नेणें अद्वय वाटा । रामकृष्णीं पैठा कैसा होय ॥२॥
द्वैताची झाडणी गुरुविण ज्ञान । त्या कैंचें कीर्तन घडे नामीं ॥३॥
ज्ञानदेव म्हणे सगुण हें ध्यान । नामपाठ मौन प्रपंचाचें ॥४॥

१०

त्रिवेणीसंगमीं नाना तीर्थें भ्रमीं । चित्त नाहीं नामीं तरी ते व्यर्थ ॥१॥
नामासी विन्मुख तो नर पापिया । हरीविण धांवया न पावे कोणी ॥२॥
पुराणप्रसिद्ध बोलिले वाल्मिक । नामें तिन्ही लोक उद्धरती ॥३॥
ज्ञानदेव म्हणे नाम जपा हरिचें । परंपरा त्याचें कुळ शुद्ध ॥४॥

११

हरिउच्चारणीं अनंत पापराशी । जातील लयासी क्षणमात्रें ॥१॥
तृण अग्निमेळें समरस झालें । तैसें नामें केलें जपता हरी ॥२॥
हरिउच्चारण मंत्र पैं अगाध । पळे भूतबाधा भय याचें ॥३॥
ज्ञानदेव म्हणे हरि माझा समर्थ । न करवे अर्थ उपनिषदां ॥४॥

१२

तीर्थ व्रत नेम भावेवीण सिद्धी । वायांची उपाधी करिसी जनां ॥१॥
भावबळें आकळे येरवी नाकळे । करतळीं आंवळे तैसा हरी ॥२॥
पारियाचा रवा घेतां भूमीवरी । यत्न परोपरी साधन तैसें ॥३॥
ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण । दिधलें संपूर्ण माझे हातीं ॥४॥

१३

समाधि हरीची सम सुखेंवीण । न साधेल जाण द्वैतबुद्धि ॥१॥
बुद्धीचें वैभव अन्य नाहीं दुजें । एका केशवराजे सकळ सिद्धि ॥२॥
ऋद्धि सिद्धि अन्य निधि अवघीच उपाधी । जंव त्या परमानंदी मन नाहीं ॥३
ज्ञानदेवीं रम्य रमलें समाधान । हरीचें चिंतन सर्वकाळ ॥४॥

१४

नित्य सत्य मित हरिपाठ ज्यासी । कळिकाळ त्यासी न पाहे दृष्टी ॥१॥
रामकृष्णीं वाचा अनंतराशी तप । पापाचे कळप पळती पुढें ॥२॥
हरि हरि हरि मंत्र हा शिवाचा । म्हणती जे वाचा तया मोक्ष ॥३॥
ज्ञानदेवा पाठ नारायण नाम । पाविजे उत्तम निज स्थान ॥४॥

१५

एक नाम हरि द्वैतनाम दूरी । अद्वैत कुसरी विरळा जाणे ॥१॥
समबुद्धि घेतां समान श्रीहरी । शमदमां वरी हरि झाला ॥२॥
सर्वांघटी राम देहादेहीं एक । सूर्य प्रकाशक सहस्ररश्मी ॥३॥
ज्ञानदेवा चित्तीं हरिपाठ नेमा । मागिलिया जन्मा मुक्त झालों ॥४॥

१६

हरिनाम जपे तो नर दुर्लभ । वाचेसी सुलभ राम कृष्ण ॥१॥
राम कृष्ण नामीं उन्मनी साधली । तयासी लाधली सकळ सिद्धि ॥२॥
सिद्धि बुद्धि धर्म हरिपाठीं आले । प्रपंची निमाले साधुसंगे ॥३॥
ज्ञानदेवीं नाम रामकृष्ण ठसा । तेणें दशदिशा आत्माराम ॥४॥

१७

हरिपाठकीर्ति मुखें जरी गाय । पवित्रचि होय देह त्याचा ॥१॥
तपाचे सामर्थ्यें तपिन्नला अमूप । चिरंजीव कल्प वैकुंठीं नांदे ॥२॥
मतृपितृभ्रात सगोत्र अपार । चतुर्भुज नर होऊनि ठेले ॥३॥
ज्ञान गूढगम्य ज्ञानदेवा लाधलें । निवृत्तीनें दिधलें माझें हातीं ॥४॥

१८

हरिवंशपुराण हरिनाम संकीर्तन । हरिविण सौजन्य नेणे कोणी ॥१॥
त्या नरा लाधलें वैकुंठ जोडलें । सकळही घडलें तीर्थाटण ॥२॥
मनोमार्गें गेला तो तेथें मुकला । हरिपाठीं स्थिरावला तोचि धन्य ॥३॥
ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी । रामकृष्णी आवडी सर्वकाळ ॥४॥

१९

नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी । पापें अनंत कोटी गेलीं त्यांची ॥१॥
अनंत जन्मांचें तप एक नाम । सर्व मार्ग सुगम हरिपाठी ॥२॥
योग याग क्रिया धर्माधर्म माया । गेले ते विलया हरिपाठी ॥३॥
ज्ञानदेवी यज्ञयाग क्रिया धर्म । हरीविण नेम नाहीं दुजा ॥४॥

२०

वेदशास्त्रपुराण श्रुतीचें वचन । एक नारायण सारा जप ॥१॥
जप तप कर्म हरीविण धर्म । वाउगाचि श्रम व्यर्थ जाय ॥२॥
हरीपाठी गेले ते निवांताचि ठेले । भ्रमर गुंतले सुमनकळिके ॥३॥
ज्ञानदेवीं मंत्र हरिनामाचें शस्त्र । यमें कुळगोत्र वर्जियेलें ॥४॥

२१

काळ वेळ नाम उच्चारितां नाहीं । दोन्ही पक्ष पाहीं उद्धरती ॥१॥
रामकृष्ण नाम सर्व दोषां हरण । जडजीवां तारण हरि एक ॥२॥
हरिनाम सार जिव्हा या नामाची । उपमा त्या देवाची कोण वानी ॥३॥
ज्ञानदेवा सांग झाला हरिपाठ । पूर्वजां वैकुंठ मार्ग सोपा ॥४॥

२२

नित्यनेम नामीं ते प्राणी दुर्लभ । लक्षुमीवल्लभ तयां जवळी ॥१॥
नारायण हरी नारायण हरी । भुक्ति मुक्ति चारी घरीं त्यांच्या ॥२॥
हरिविण जन्म नर्कचि पैं जाणा । यमाचा पाहुणा प्राणी होय ॥३॥
ज्ञानदेव पुसे निवृत्तिसी चाड । गगनाहूनि वाड नाम आहे ॥४॥

२३

सात पांच तीन दशकांचा मेळा । एक तत्त्वी कळा दावी हरी ॥१॥
तैसें नव्हे नाम सर्वत्र वरिष्ठ । तेथें कांहीं कष्ट न लागती ॥२॥
अजपा जपणें उलट प्राणाचा । येथेंही मनाचा निर्धार असे ॥३॥
ज्ञानदेवा जिणें नामेंविण व्यर्थ । रामकृष्णीं पंथ क्रमियेला ॥४॥

२४

जप तप कर्म क्रिया नेम धर्म । सर्वांघटीं राम भाव शुद्ध ॥१॥
न सोडी हा भावो टाकी रे संदेहो । रामकृष्ण टाहो नित्य फोडी ॥२॥
जाति वित्त गोत्र कुळ शीळ मात । भजकां त्वरित भावनायुक्त ॥३॥
ज्ञानदेव ध्यानीं रामकृष्ण मनीं । वैकुंठभुवनीं घर केलें ॥४॥

२५

जाणीव नेणीव भगवंतीं नाहीं । हरिउच्चारणी पाही मोक्ष सदा ॥१॥
नारायण हरी उच्चार नामाचा । तेथें कळिकाळाचा रीघ नाहीं ॥२॥
तेथील प्रमाण नेणवे वेदांसी । तें जीवजंतूंसी केवीं कळे ॥३॥
ज्ञानदेव फळ नारायण पाठ । सर्वत्र वैकुंठ केलें असे ॥४॥

२६

एक तत्त्व नाम दृढ धरीं मना । हरीसी करुणा येईल तुझी ॥१॥
तें नाम सोपें रे रामकृष्ण गोविंद । वाचेसी सद्गद जपे आधीं ॥२॥
नामापरतें तत्त्व नाहीं रे अन्यथा । वायां आणि पंथा जाशी झणी ॥३॥
ज्ञानदेव नाम जपमाळ अंतरी । धरोनी श्रीहरी जपे सदा ॥४॥

२७

सर्व सुख गोडी साही शास्त्रें निवडी । रिकामा अर्धघडी राहूं नको ॥१॥
लटिका व्यवहार सर्व हा संसार । वायां येरझार हरीविण ॥२॥
नाममंत्र जप कोटी जाईल पाप । रामकृष्णीं संकल्प धरूनी राहे ॥३॥
निजवृत्ति हे काढी माया तोडी । इंद्रियांसवडी लपूं नको ॥४॥
तीर्थीं व्रतीं भाव धरीं रे करुणा । शांति दया पाहुणा हरि करीं ॥५॥

२८

अभंग हरिपाठ असती अठ्ठावीस । रचिले विश्वासें ज्ञानदेवें ॥१॥
नित्य पाठ करी इंद्रायणीतीरीं । होय अधिकारी सर्वथा तो ॥२॥
असावें एकाग्रीं स्वस्थ चित्त मन । उल्हासें करून स्मरण जीवी ॥३॥
अंतकाळीं तैसा संकटाचें वेळीं । हरि तया सांभाळी अंतर्बाह्य ॥४॥
संतसज्जनानीं घेतली प्रचीती । आळशी मंदमती केवीं तरें ॥५॥
श्रीगुरु निवृत्ति वचन प्रेमळ । तोषला तात्काळ ज्ञानदेव ॥६॥

२९

कोणाचें हें घर हा देह कोणाचा । आत्माराम त्याचा तोचि जाणे ॥१॥
मी तूं हा विचार विवेक शोधावा । गोविंदा माधवा याच देहीं ॥२॥
देहीं ध्याता ध्यान त्रिपुटीवेगळा । सहस्र दळीं उगवला सूर्य जैसा ॥३॥
ज्ञानदेव म्हणे नयनाची ज्योती । या नावें रूपें तुम्ही जाणा ॥४॥

॥ इति श्रीज्ञानदेव हरिपाठ समाप्त ॥

---

२ श्रीनामदेवमहाराजकृत हरिपाठाचे अभंग

१

नामाचा महिमा कोण करी सीमा । जपावें श्रीरामा एका भावें ॥१॥
न लगती स्तोत्रें नाना मंत्रें यंत्रें । वर्णिजे बा वक्त्रें श्रीरामनाम ॥२॥
अनंत पुण्यराशी घडे ज्या प्राण्यासी । तरीच मुखासी नाम येत ॥३॥
नामा म्हणें नाम महाजप परम । तो देह उत्तम मृत्युलोकीं ॥४॥

२

जन्माचें कारण रामनामपाठीं । जाइजे वैकुंठीं एकीहेळा ॥१॥
रामनाम ऐसा जिव्हे उमटे ठसा । तो उद्धरेल आपैसा इहलोकीं ॥२॥
दो अक्षरीं राम जप हा परम । नलगे तुज नेम नाना पंथ ॥३॥
नामा म्हणे पवित्र श्रीरामचरित्र । उद्धरिते गोत्र पूर्वजेंसी ॥४॥

३

विषयांचे कोड कां करिसी गोड । होईल तुज जोड इंद्रियबाधा ॥१॥
सर्वही लटिकें जाण तूं बा निकें । रामाविण एकें न सुटिजे ॥२॥
मायाजाळ मोहें इंद्रियांचा रोहो । परि न धरेचि भावो भजनपंथें ॥३॥
नामा म्हणे देवा करीं तूं लावलाही । मयूराचा टाहो घनगर्जना ॥४॥

४

कांसवीचे दृष्टी जैं येईजे भेटी । तैं अमृताची सृष्टी घडे त्यासी ॥१॥
तैसें हें भजन श्रीरामाचें ध्यान । वाचे नारायण अमृतमय ॥२॥
धन्य त्याचें कुळ सदा पैं सुफळ । दिननिशीं पळ रामनाम ॥३॥
नामा म्हणे चोखट भक्त तो उत्तम । वाचेसी सुगम रामनाम ॥४॥

५

सदा फळ सुफळ वाचेसी गोपाळ । वंदी कळिकाळ शास्त्र सांगे ॥१॥
ब्रह्मांडनायक ऐसें जें कौतुक । तेंचि नाम एक श्रीकृष्ण ऐसें ॥२॥
आदि अंत पाहतां नाहीं पैं सर्वथा । परिपूर्ण सरिता अमृताची ॥३॥
नामा म्हणे अनंत कां करिशी संकेत । उद्धरिले पतित युगायुगीं ॥४॥

६

गोविंद गोपाळ वाचेसी निखळ । तो उद्धरे तात्काळ कलीमाजी ॥१॥
नारायण नारायण हेंचि पारायण । उद्धरले जन इहलोकीं ॥२॥
तुटती यातना कर्माच्या भावना । जडजीवउद्धारणा नाम स्मरा ॥३॥
नामा म्हणे राम हा जप परम । न लगती नेम नाना कोटी ॥४॥

७

तीर्थ जपराशी जप हृषीकेशी । मुखीं अहर्निशीं रामनाम ॥१॥
तीर्थाचें पैं तीर्थ नाम हें समर्थ । होईल कृतार्थ रामनामें ॥२॥
होईल साधन तुटेल बंधन । वाचे जनार्दन सुफळ सदा ॥३॥
नामा म्हणे हरी उच्चार तूं करीं । उद्धरसी निर्धारीं इहलोकीं ॥४॥

८

पाहतां ये परिपाटी आणिक नाहीं सृष्टी । नामेंविण दृष्टीं न दिसे माझ्या ॥१॥
नमचि समर्थ नामचि मथित । शंकरासी हेत रामनामीं ॥२॥
भरती सर्व काम वाचे रामनाम । न लगती ते नेम कर्मजाळ ॥३॥
नामा म्हणे उच्चार न करीं तूं विचार । तुटेल येरझार नाना योनी ॥४॥

९

तपाचें हें तप राम हें अमूप । करीं का रे जप रामनामीं ॥१॥
रामकृष्ण म्हणे वाचे नारायण । तुटेल बंधन यमपाश ॥२॥
साधेल साधन होती कोटी यज्ञ । राम जनार्दन जपे करीं ॥३॥
नामा म्हणे जिव्हे नामस्मरण करी । म्हणे नरहरी एक्या भावें ॥४॥

१०

हाचि नेम सारीं साधेल तो हरी । नाम हें मुरारी अच्युताचें ॥१॥
राम गोविंद हरे कृष्ण गोविंद हरे । यादव मोहरे रामनाम ॥२॥
न लगती कथा नाना विकळता । नामचि स्मरतां राम वाचे ॥३॥
नाम म्हणे राम आम्हां हाचि नेम । नित्य तो सप्रेम जप आम्हां ॥४॥

११

करूं हें कीर्तन राम नारायण । जनीं जनार्दन हेंचि देखें ॥१॥
जगाचा जनक रामकृष्ण एक । न करितां विवेक स्मरें राम ॥२॥
तुटेल भवजाळ कां करिशी पाल्हाळ । सर्व मायाजाळ इंद्रियबाधा ॥३॥
नामा म्हणे गोविंद स्मरें तूं सावध । नव्हे तुज बाधा नाना विघ्नें ॥४॥

१२

मायेचीं भूचरे रज तम सात्त्विक । रामनाम एक सोडवणें एक ॥१॥
राम हेंचि स्नान राम हेंचि ध्यान । नामें घडती यज्ञ कोटी देवा ॥२॥
न लगती साधनें नाना मंत्र विवेक । रामनामीं मुख रंगवी कां रे ॥३॥
नामा म्हणे श्रीराम हेंचि वचन आम्हां । नित्य ते पौर्णिमा सोळा कळी ॥४॥

१३

माझें मी करितां गेले हे दिवस । न धरीच विश्वास राम नामीं ॥१॥
अंतीं तुज उद्धरती राम कृष्ण हरी । राम पंचाक्षरी मंत्रसार ॥२॥
कां करिशी सांठा प्रपंच विस्तार । न तुटे येरझार नामेंविण ॥३॥
नामा म्हणे ऐसें रामनामीं पिसें । तो उद्धरेल आपैसें इहलोकीं ॥४॥

१४

नको नको माया सांडीं लवलाह्या । पुढील उपाया झोंबें कां रे ॥१॥
राम नाम म्हणे तुटेल बंधन । भावबंधमोचन एक्या नामें ॥२॥
स्मरतां पतित उद्धरेल यतार्थ । नाम हाचि स्वार्थ तया झाला ॥३॥
नामा म्हणे हा जप करी तूं अमूप । नामें चुके खेप इये जनीं ॥४॥

१५

स्मरण करितां रामनामध्वनी । ऐकतांचि कर्णीं पळती यम ॥१॥
नामपाठ करा राम कृष्ण हरी । होतील कामारी ऋद्धि सिद्धि ॥२॥
साध्य तेंचि साधीं न करी उपाधी । जन्मांतरीच्या व्याधी हरती नामें ॥३॥
नामा म्हणे सर्व राम हाचि भाव । नाहीं आणिक देव रामेंविण ॥४॥

१६

रामकृष्णमाळा घालितां अढळ । तुटेल भवजाळ मायामोह ॥१॥
होशील तूं साधु न पावती बाधु । पूर्ण ब्रह्मानंदु तुष्टेल तुज ॥२॥
जपतां रामनाम पुरती सर्व काम । आदि अंति नेम साधेल तुज ॥३॥
नामा म्हणे कृतार्थ सर्व मनोरथ । न लगती ते अर्थ मायापाश ॥४॥

१७

शरीर संपत्ती मायेचें टवाळ । वायांचि पाल्हाळ मिरवितोसी ॥१॥
नाम हेचि तारी विठ्ठलनिर्धारीं । म्हणे हरी हरी एक वेळां ॥२॥
स्मरतां गोपाळनामा वंदितील यम । न लगती नेम मंत्रबाधा ॥३॥
नामा म्हणे सार मंत्र तो उत्तम । राम हेंचि नाम स्मरें कां रे ॥४॥

१८

कृष्णकथा संग जेणें तुटे पांग । न लगे तुज उद्योग करणें कांहीं ॥१॥
समर्थ सोयरा राम हा निधान । जनीं जनार्दनीं एक ध्यायी ॥२॥
नामा म्हणे उच्चार रामकृष्ण सार । तुटेल येरझार भवाब्धीची ॥३॥

१९

भवाब्धीतारक रामकृष्ण नांव । रोहिणीची माव सकळ दिसे ॥१॥
नाम हेंचि थोर नाम हेंचि थोर । वैकुंठीं बिढार रामनामें ॥२॥
राम हे निशाणी जपतांची अढळ । वैकुंठ तात्काळ तया जीवा ॥३॥
नामा म्हणे वैकुंठ नामेंचि जोडेल । अंतीं तुज पावेल राम एक ॥४॥

२०

जळाचा जळबिंदु जळींच तो विरे । तैसें हें विधारे पांचाठायीं ॥१॥
जीव शिव विचार नाम हें मधुर । जिव्हेसी उपचार रामनाम ॥२॥
रामनाम तारक शिव षडक्षरी । तैची वाचा करीं अरे मूढा ॥३॥
नामा म्हणे ध्यान शिवाचें उत्तम । मंत्र हा परम रामनाम ॥४॥

२१

करितां हरिकथा नाम सुखराशी । उद्धरी जीवासी एका नामें ॥१॥
तें हें रामनाम जपे तूं सप्रेम । जप हा सुगम सुफळ सदा ॥२॥
नामेंचि तरले नामेंचि पावले । नाम म्हणतां गेले वैकुंठासी ॥३॥
नामा म्हणे एका नामेंसी विनटे । ते वैकुंठींचे पेठे पावले देखा ॥४॥

२२

नामावांचूनि कांहीं दुकें येथें नाहीं । वेगीं लवलाहीं राम जपा ॥१॥
गोविंद गोपाळ वाचेसी रसाळ । पावसी केवळ निजपद ॥२॥
ध्रुव प्रल्हाद बळी अंबऋषि प्रबुद्ध । नामेंचि चित्पद पावले देख ॥३॥

नामा म्हणे राम वाचे जपा नाम । संसार भवभ्रम हरे नामें ॥ ४ ॥

२३

म्हणतां वाचे नाम वंदी तया यम । काळादिक सम वंदी तया ॥ १ ॥
ऐसें नाम श्रेष्ठ सकळांसी वरिष्ठ । उच्चारितां नीट वैकुंठ गाजे ॥ २ ॥
तो हा नाममहिमा वाखाणीत ब्रह्मा । न कळे तया उपमा आदिअंतीं ॥ ३ ॥
नामा म्हणे पाठें नामाचेनि वाटें । तरी प्रत्यक्ष भेटे विठ्ठल हरी ॥ ४ ॥

२४

विष्णुनाम श्रेष्ठ गाती देवऋषी । नाम अहर्निशी गोपाळाचें ॥ १ ॥
हरी हरि हरि हरि तूंचि बा श्रीहरि । असे चराचरीं जनार्दना ॥ २ ॥
आदिब्रह्म हरि आळवी त्रिपुरारी । उमेप्रति करी उपदेश ॥ ३ ॥
नामा म्हणे नाम महाजप परम । शंकरासी नेम दिनदिशीं ॥ ४ ॥

२५

कां करतोसी सीण वाचे नारायण । जपतां समाधान होईल तुज ॥ १ ॥
राम कृष्ण हरी नारायण गोविंद । वाचेसी हा छंद नामपाठ ॥ २ ॥
वंदील तो यम कळिकाळ सर्वदा । न पावसी आपदा असत देही ॥ ३ ॥
नामा म्हणे ओळंग शीण झाला संगें । प्रपंच वाउगे सांडी परते ॥ ४ ॥

२६

नामाचेनि पाठे जातील वैकुंठें । तो पुंडलीक पेठे प्रकट असे ॥ १ ॥
विठ्ठल हा मंत्र सांगतसे शास्त्र । आणिक नाही शस्त्र नामाविण ॥ २ ॥
पुराण व्युत्पत्ति न लगती श्रुती । मुनि हरिपंथी गेले ॥ ३ ॥
नामा म्हणे हरी नामेंचि उद्धरी । जन्माची येरझारी हरे नामें ॥ ४ ॥

२७

सर्वांभूतीं भजें नमन करीं संता । नित्य त्या अच्युता स्मरण करी ॥ १ ॥
ऐसी भजनी विनट सांपडेल वाट । रामकृष्ण नीट वैकुंठींची ॥ २ ॥
न लगतीं साधनें वायाचि बंधन । हरिनामपंथीं जाण मुनि गेले ॥ ३ ॥
नामा म्हणे थोर नामचि साधार । वैकुंठीं बिढार तयां भक्ता ॥ ४ ॥

२८

तूं तव नेणता परि हरि तो जाणता । आहे तो समता सर्वां भूतीं ॥ १ ॥
सर्वब्रह्म हरि एकचि निर्धारी । होशी झडकरी ब्रह्म तूंचि ॥ २ ॥
अच्युत माधव अमृताच्या पाठें । लागतांचि वाते वंदी यम ॥ ३ ॥
नामा म्हणे होशी जिवलग विष्णूचा । दास त्या हरीचा आवडता ॥ ४ ॥

२९

कां करिसी सोस मायेचा असोस । नव्हे तुझा सौरस नामेंविण ॥ १ ॥
नामचेचि मंत्र नामचेचि तंत्र । नामविण पवित्र न होती देखा ॥ २ ॥
तिहीं लोकीं काहीं नामेंविण सर्वथा । अच्युत म्हणतां पुण्यकोटी ॥ ३ ॥
नामा म्हणे ब्रह्म आदि अंतीं नेम । तें विटेवरी सम उभें असे ॥ ४ ॥

३०

पवित्र परिकर हा उच्चार । उद्धरण साचार जगासी या ॥ १ ॥
गोविंद केशव उच्चारीं श्रीराम । न लगती नेम अमूप जप ॥ २ ॥
तें हें विठ्ठलरूप पिकलें पंढरीं । नाम चराचरीं विठ्ठल ऐसें ॥ ३ ॥
नामा म्हणे विठ्ठल सर्वांत सखोल । उच्चारितां मोल न लगे तुज ॥ ४ ॥

३१

पोशिसी शरीर इंद्रियांची बाधा । शेखीं तें आपदा करील तुज ॥ १ ॥
नव्हे तुझें हित विषय पोषितां । हरी हरी म्हणतां उद्धरसी ॥ २ ॥
वायांचि पाल्हाळ चरित्रु सांगसी । परी नाम न म्हणसी अरे मूढा ॥ ३ ॥
नामा म्हणे हेचि पंढरीये निधान । उच्चारिता जन तरले ऐसें ॥ ४ ॥

३२

विषय खटपट आचार सांगसी । विठ्ठल न म्हणसी अरे मूढा ॥ १ ॥
पूर्णब्रह्म हरी विठ्ठल श्रीहरी । अंतीं हा निर्धारीं तारील सत्य ॥ २ ॥
न लगे सायास करणें उपवास । नामाचा विश्वास ऐसा धरीं ॥ ३ ॥
नामा म्हणे प्रेम धरीं सप्रेम । विठ्ठल हाचि नेम दिनदिशीं ॥ ४ ॥

३३

नव्हे तुज हित म्हणतां विषय पोषिता । हरी हरी म्हणतां तरशील ॥ १ ॥
माधव श्रीहरी कृष्ण नरहरी । वेगीं हें उच्चारीं लवलाहीं ॥ २ ॥
घडतील यज्ञ पापें भग्न होत । प्रपञ्च सर्वत्र होईल ब्रह्म ॥ ३ ॥
नामा म्हणे हरिकथा हरी भवव्यथा । उद्धरसी सर्वथा भाक माझी ॥ ४ ॥

३४

उपदेश सुगम आइके रे एक । नाम हें सम्यक विठ्ठलाचें ॥ १ ॥
जनीं जनार्दन भावचि संपन्न । विठ्ठल उद्धरण कलीमाजीं ॥ २ ॥
साधेल निधान पुरेल मनोरथ । नामेंचि कृतार्थ होसी जनीं ॥ ३ ॥
नामा म्हणे नाम घेई तूं झडकरी । पावशी निर्धारीं वैकुंठपद ॥ ४ ॥

॥ इति श्रीनामदेव हरिपाठ समाप्त ॥

---

३ श्री एकनाथमहाराजकृत हरिपाठाचे अभंग

१

हरीचिया दासा हरि दाही दिशा । भावें जैसा तैसा हरि एक ॥ १ ॥
हरी मुखीं गातां हरपली चिंता । त्या नाहीं मागुता जन्म घेणें ॥ २ ॥
जन्म घेणें लागे वासनेच्या संगे । तेचि झालीं अंगें हरिरूप ॥ ३ ॥
हरिरूप झालें जाणीव हरपले । मीतूंपणा गेलें हरीचे ठायीं ॥ ४ ॥
हरिरूप ध्यानीं हरिरूप मनीं । एका जनार्दनीं हरि बोला ॥ ५ ॥

२

हरि बोला हरि बोला नातरी अबोला । व्यर्थ गलबला करूं नका ॥ १ ॥
नको अभिमान नको नको मान । सोडीं मीतूंपण तोचि सुखी ॥ २ ॥
सुखी त्याणें व्हावें जगा निववावें । अज्ञानी लावावे सन्मार्गासी ॥ ३ ॥
मार्ग जया कळे भावभक्तिबळें । जगाचिये मेळे न दिसती ॥ ४ ॥
जनीं वनीं प्रत्यक्ष लोचनीं । एका जनार्दनीं ओळखिलें ॥ ५ ॥

३

ओळखिला हरी धन्य तो संसारी । मोक्ष त्याचे घरीं सिद्धीसहित ॥ १ ॥
सिद्धी लावी पिसें कोण तया पुसे । नेलें राजहंसें पाणी काय ॥ २ ॥
काय तें करावें संदेहीं निर्गुण । ज्ञानानें सगुण ओस केलें ॥ ३ ॥
केलें कर्म झालें तेंचि भोगा आलें । उपजले मेले ऐसे किती ॥ ४ ॥
एका जनार्दनीं नाहीं यातायाती । सुखाची विश्रांती हरीसंगें ॥ ५ ॥

४

जें जें दृष्टी दिसे तें तें हरिरूप । पूजा ध्यान जप त्यासी नाहीं ॥ १ ॥
वैकुंठ कैलासी तीर्थक्षेत्रीं देव । तयाविण ठाव रिता कोठें ॥ २ ॥
वैष्णवांचें गुह्य मोक्षांचा एकांत । अनंतासी अंत पाहतां नाहीं ॥ ३ ॥
आदि मध्य अवघा हरि एक । एकाचे अनेक हरि करी ॥ ४ ॥
एकाकार झाले जीव दोन्ही तिन्ही । एका जनार्दनीं ऐसें केलें ॥ ५ ॥

५

नामाविण मुख सर्पाचें तें बीळ । जिव्हा काळसर्प आहे ॥ १ ॥
वाचा नव्हे लांब जळो त्याचें जिणें । यातना भोगणें यमपुरीं ॥ २ ॥
हरीविण कोणी नाहीं सोडविता । पुत्र बंधु कांता संपत्तिचे ॥ ३ ॥

अंतकाळीं कोणी नाहीं बा सांगाती ।साधूचे संगतीं हरी जोडे ॥४॥
कोटि कुळें तारी हरि अक्षरें दोन्ही ।एका जनार्दनीं पाठ केलीं ॥५॥

६

धन्य माय व्याली सुकृताचें फळ ।फळ निर्फळ हरीविण ॥१॥
वेदांताचें बीज हरि हरि अक्षरें ।पवित्र सोपारें हेंचि एक ॥२॥
योग याग व्रत नेम दानधर्म ।नलगे साधन जपतां हरि ॥३॥
साधनाचें सार नाम मुखीं गातां ।हरि हरि म्हणतां कार्यसिद्धी ॥४॥
नित्य मुक्त तोचि एक ब्रह्मज्ञानी ।एका जनार्दनीं हरि बोला ॥५॥

७

बहुतां सुकृतें नरदेह लाधला ।भक्तीविण गेला अधोगती ॥१॥
पाप भाग्य कैसे न सरेचि कर्म ।न कळेचि वर्म अरे मूढा ॥२॥
अनंत जन्मींचें सुकृत पदरीं ।त्याचे मुखीं हरि पैठा होय ॥३॥
राव रंक हो कां उंच नीच याती ।भक्तीविण माती मुखीं त्याच्या ॥४॥
एका जनार्दनीं हरि हरि म्हणतां ।मुक्ती सायुज्यता पाठी लागे ॥५॥

८

हरिनामामृत सेवी सावकाश ।मोक्ष त्याचे भूस दृष्टीपुढें ॥१॥
नित्य नामघोष जयाचे मंदिरीं ।तेचि काशीपुरी तीर्थक्षेत्र ॥२॥
वाराणसी तीर्थक्षेत्रा नाश आहे ।अविनाशासी पाहे नाश कैचा ॥३॥
एका तासामाजीं कोटि वेळा सृष्टी ।होती जाती दृष्टि पाहें तोचि ॥४॥
एका जनार्दनीं ऐसें किती झालें ।हरिनाम सेविलें तोचि एक ॥५॥

९

भक्तीविण पशु कशासी वाढला ।सटवीने नेला कैसा नाहीं ॥१॥
काय माय गेली होती भूतापासीं ।हरि न ये मुखासी अरे मूढा ॥२॥
पातकें करिता पुढें आहे पुसता ।काय उत्तर देतां होशील तूं ॥३॥
अनेक यातना यम करवील ।कोण सोडवील तेथें तुजला ॥४॥
एका जनार्दनीं सांगताहें तोंदें ।आहा वाचा रडे बोलतांचि ॥५॥

१०

स्वहिताकारणें संगती साधूची ।भावें भक्ति हरीची भेटी तेणें ॥१॥
हरि तेथें संत संत तेथें हरी ।ऐसें वेद चारी बोलताती ॥२॥
ब्रह्मा डोळसातें वेदार्थ ना कळे ।तेथें हे आंधळे व्यर्थ होती ॥३॥
वेदार्थाचा गोंवा कन्याअभिलाष ।वेदें नाहीं ऐसें सांगितलें ॥४॥
वेदांचीं हीं बीजाक्षरें हरी दोनी ।एका जनार्दनीं हरि बोला ॥५॥

११

सत्पद तें ब्रह्म चित्पद तें माया ।आनंदपदीं जया म्हणती हरी ॥१॥
सत्पद निर्गुण चित्पद सगुण ।सगुण निर्गुण हरिपायीं ॥२॥
तत्सदिति ऐसें पैल वस्तूवरी ।गीतेमाजी हरि बोलियेले ॥३॥
हरिपदप्राप्ती भोळ्या भाविकांसी ।अभिमानियांसी नर्कवास ॥४॥
अस्ति भाति प्रिय ऐशीं पदें तिनी ।एका जनार्दनीं तेंचि झालें ॥५॥

१२

नाकळे तें कळे कळे तें नाकळे ।वळे तें ना वळें गुरुविणें ॥१॥
निर्गुण पावलें सगुणीं भजतां ।विकल्प धरितां जिव्हा झडे ॥२॥
बहुरूपी घरी संन्यासाचा वेष ।पाहोन तयास धन देती ॥३॥
संन्याशाला नाहीं बहुरूपियाला ।सगुणीं भजला तेथें पावे ॥४॥
अद्वैताचा खेळ दिसे गुणागुणीं ।एका जनार्दनीं ओळखिलें ॥५॥

१३

ओळखिला हरि सांठविला पोटीं ।होतां त्याची भेटी दुःख कैंचें ॥१॥
नर अथवा नारी हो कां दुराचारी ।मुखीं गातां हरि पवित्र तो ॥२॥
पवित्र तें कुळ धन्य त्याची माय ।हरि मुखें गाय नित्य नेमें ॥३॥
काम क्रोध लोभ जयाचे अंतरीं ।नाहीं अधिकारी ऐसा येथें ॥४॥
वैष्णवांचें गुह्य काढिलें निवडुनी ।एका जनार्दनीं हरि बोला ॥५॥

१४

हरि बोला देतां हरि बोला घेतां ।हांसतां खेळतां हरि बोला ॥१॥
हरि बोला गातां हरि बोला खातां ।सर्व कार्य करितां हरि बोला ॥२॥
हरि बोला एकांतीं हरि बोला लोकांतीं ।देहत्यागाअंतीं हरि बोला ॥३॥
हरि बोला भांडतां हरि बोला कांडतां ।उठतां बैसतां हरि बोला ॥४॥
हरि बोला जनीं हरि बोला विजनीं ।एका जनार्दनीं हरि बोला ॥५॥

१५

एक तीन पांच मेळा पञ्चवीसांच ।छत्तिस तत्त्वांचा मूळ हरि ॥१॥
कल्पना अविद्या तेणे झाला जीव ।मायोपाधी शिव बोलिजेति ॥२॥
जीव शिव दोन्ही हरिरूपीं तरंग ।सिंधु तो अभंग नेणें हरी ॥३॥
शुक्तीवरी रजत पाहतां डोळां दिसे ।रज्जूवरी भासे मिथ्या सर्प ॥४॥
क्षेत्र-क्षेत्रज्ञातें जाणताती ज्ञानी ।एका जनार्दनीं हरि बोला ॥५॥

१६

कल्पनेपासूनी कल्पिला जो ठेवा ।तेणें पडे गोंवा नेणे हरी ॥१॥
दिधल्या वांचूनि फळप्राप्ति कैंची ।इच्छा कल्पनेची व्यर्थ बापा ॥२॥
इच्छावे ते जवळी चरण हरीचे ।चरण सर्व नारायण देतो तुज ॥३॥
न सुटे कल्पना अभिमानाची गांठी ।घेतां जन्म कोटी हरि कैंचा ॥४॥
एका जनार्दनीं सांपडली खूण ।कल्पना अभिमान हरि झाला ॥५॥

१७

काय पद्मनीचे षंढासी सोहळे ।वांझेसी दोहाळे कैची होती ॥१॥
अंधापुढें दीप खरासी चंदन ।सर्पासी दुधपान करूं नये ॥२॥
क्रोधि अविश्वासी त्यासी बोध कैंचा ।व्यर्थ आपुली वाचा शिणवूं नये ॥३॥
खळाची संगती उपयोगासी न ये ।आपणा अपाय त्याचे संगे ॥४॥
वैष्णवीं कुपथ्य टाकिल वाळूनी ।एका जनार्दनीं तेचि भले ॥५॥

१८

न जायेचि ताठा नित्य खटाटोप ।मण्डुकीं वटवट तैसे ते गा ॥१॥
प्रेमावीण भजन नाकाविण मोती ।अर्थाविण पोथी वाचुनी काय ॥२॥
कुंकवा नाहीं ठावे म्हणे मी आहेव ।भावावीण देव कैसा पावे ॥३॥
अनुतापेवीण भाव कैसा राहे ।अनुभवें पाहें शोधूनियां ॥४॥
पाहतां पाहणें गेलें तें शोधूनी ।एका जनार्दनीं अनुभविलें ॥५॥

१९

परिमळ गेलिया वोस फुल देठीं ।आयुष्या शेवटीं देह तैसा ॥१॥
घडीघडी काळ वाट याची पाहे ।अजून किती आहे अवकाश ॥२॥
हाचि अनुताप घेऊन सावध ।कांहीं तरी बोध करीं मना ॥३॥
एक तास उरला खट्वांग रायासी ।भाग्यदशा कैसी प्राप्त झाली ॥४॥
सांपडला हरि तयाला साधनीं ।एका जनार्दनीं हरि बोला ॥५॥

२०

करा रे बापांनो साधन हरीचें ।झणीं करणीचें करूं नका ॥१॥
जेणें बा न ये जन्म यमाची यातना ।ऐशिया साधना करा कांहीं ॥२॥
साधनाचें सार मंत्रबीज हरी ।आत्मतत्त्व धरी तोचि एक ॥३॥
कोटि कोटि यज्ञ नित्य ज्याचा नेम ।एक हरि नाम जपतां घडे ॥४॥
एका जनार्दनीं न घ्यावा संशय ।निश्चयेंसी होय हरिरूप ॥५॥

२१

बारा सोळा जणी हरीसी नेणती ।म्हणोनी फिरती रात्रंदिवस ॥१॥
सहस्र मुखांचा वर्णितां भागला ।हर्ष जया झाला तेणें सुखें ॥२॥
वेद जाणूं गेला पुधें मौनावला ।तें गुह्य तुजला प्राप्त कैंचें ॥३॥
पूर्व सुकृताचा पूर्ण अभ्यासाचा ।दास सद्गुरूचा तोचि जाणे ॥४॥
जाणते नेणते हरीचे ठिकाणीं ।एका जनार्दनीं हरि बोला ॥५॥

२२

पिंडीं देहस्थिती ब्रह्मांडीं पसारा ।हरिविण सार व्यर्थ भ्रम ॥१॥
शुकयाज्ञवल्क्य दत्त कपिलमुनी ।हरिसी जाणोनि हरिच झाले ॥२॥
या रे या रे धरूं हरिनाम तारूं ।भवाचा सागरू भय नाहीं ॥३॥
साधुसंत गेले आनंदीं राहिले ।हरिनामें झाले कृतकृत्य ॥४॥
एका जनार्दनीं मांडिलें दुकान ।देतो मोलावीण सर्व वस्तु ॥५॥

२३

आवडीनें भावें हरिनाम घेसी ।तुझी चिंता त्यासी सर्व आहे ॥१॥
नको खेद करूं कोणत्या गोष्टीचा ।पति तो लक्ष्मीचा जाणतसे ॥२॥
सकळ जीवांचा करितो सांभाळ ।तुज मोकलील ऐसें नाहीं ॥३॥
जैसी स्थिति आहे तैशापरी राहें ।कौतुक तूं पाहें संचिताचें ॥४॥
एका जनार्दनीं भोग प्रारब्धाचा ।हरिकृपें त्याचा नाश झाला ॥५॥

२४

दुर्बळाची कन्या समर्थाने केली ।अवदसा निमाली दरिद्राची ॥१॥
हरिकृपा होतां भक्तां निघती दोंदें ।नाचती स्वानंदें हरिरंगीं ॥२॥
देव भक्त दोन्ही एकरूप झाले ।मुळींच संचलें जैसें तैसें ॥३॥
पाजळली ज्योती कापुराची वाती ।ओवाळितां आरती भेद नुरे ॥४॥
एका जनार्दनीं कल्पेंची मुराला ।तोचि झाला ब्रह्मरूप ॥५॥

२५

मुद्रा ती पांचवी लावूनियां लक्ष ।तो आत्मा प्रत्यक्ष हरि दिसे ॥१॥
कानीं जें पेरिलें डोळां तें उगवलें ।व्यापकें भारले तोचि हरि ॥२॥
कर्म-उपासना-ज्ञानमार्गीं झाले ।हरिपाठीं आले सर्व मार्ग ॥३॥
नित्य प्रेमभावें हरिपाठ गाय ।हरिकृपा होय तयावरी ॥४॥
झाला हरिपाठ बोलणें येथूनी ।एका जनार्दनीं हरि बोला ॥५॥

॥ इति श्री एकनाथ हरिपाठ समाप्त ॥

---

४ तुकाराममहाराजकृत हरिपाठाचे अभंग

१

नमिला गणपति माऊली सारजा ।आतां गुरुराजा दंडवत ॥१॥
गुरुरायाचरणीं मस्तक ठेविला ।आल्या स्तुतीला द्यावी मती ॥२॥
गुरुराया तुजऐसा नाहीं सखा ।कृपा करुनी रंका धरीं हातीं ॥३॥
तुका म्हणे माता पिता गुरु बंधु ।तूंचि कृपासिंधु पांडुरंगा ॥४॥

२

पहाटेच्या प्रहरीं म्हणा हरि हरी ।तया सुखा सरी नाहीं दुजें ॥१॥
केशव वामन नारायण विष्णु ।कृष्ण संकर्षणु राम राम ॥२॥
माधवा वामना श्रीधरा गोविंदा ।अच्युत मुकुंदा पुरुषोत्तमा ॥३॥
नरहरी भार्गवा गोपाळा वासुदेवा ।हृषीकेशा पावा स्मरणमात्रें ॥४॥
तुका म्हणे एका नामीं भाव । राहे होय साह्य पांडुरंग ॥५॥

३

अयोध्या मथुरा काशी अवंतिका ।कांची हे द्वारका माया सत्य ॥१॥
मोक्ष पुऱ्या ऐशा नित्य वाचे स्मरे ।प्राणी तो उद्धरे स्मरणमात्रें ॥२॥
नित्य नित्य मनीं हरि आठवावा ।तेणेंचि तरावा भवसिंधु ॥३॥
तुका म्हणे ऐसा नामाचा महिमा ।राहील जो नेमा तोचि धन्य ॥४॥

४

यमुना कावेरी गंगा भगीरथी ।कृष्णा सरस्वती तुंगभद्रा ॥१॥
नर्मदा आठवी वेळोवेळी वाचे ।नाहीं भय साचें प्राणियासी ॥२॥
जयाचे संगती प्राणी उद्धरती ।दर्शनेंच होती मुक्ति प्राप्त ॥३॥
तुका म्हणे नामीं एकनिष्ठ भाव ।तेथें वासुदेव सर्व काळ ॥४॥

५

प्रातःकाळीं नाम पवित्रचि घ्यावें ।तेणें विसरावें जन्ममृत्यु ॥१॥
नळ युधिष्ठिर जनक जनार्दन ।स्मरणेंचि धन्य होती प्राणी ॥२॥
न करा आळस नाम घेतां वाचे ।नाहीं भय साचें प्राणियांसी ॥३॥
तुका म्हणे वाचें गाईल गोविंद ।होईल परमानन्द नामें एका ॥४॥

६

कश्यप गौतम भारद्वाज अत्री ।ऋषि विश्वामित्र नाम थोर ॥१॥
जमदग्नि मुनि वसिष्ठ वर्णिला ।तिन्हीं लोकीं झाला वंद्य एक ॥२॥
नाम घेतां नुरे पाप ताप दैन्य ।होय थोर पुण्य उच्चारितां ॥३॥
तुका म्हणे ऐसी उच्चारितां वाणी ।तेथें अंतःकरणीं सुख होय ॥४॥

७

अहिल्या द्रौपदी सीता तारा चारी ।मुख्य मंदोदरी पतिव्रता ॥१॥
नामें घेतां त्यांची वाणी हे पवित्र ।होय कुळगोत्र उद्धरण ॥२॥
संकल्प विकल्प सांडोनियां दुरी ।वाचे हरि हरी उच्चारावें ॥३॥
नाहीं बद्धकता तया संसाराची ।जाचणी यमाची मग कैंची ॥४॥

८

व्यास अंबरीष वसिष्ठ नारद ।शौनक प्रल्हाद भागवत ॥१॥
नित्य स्मरण करी यांचें जरी प्राणी ।पुन्हां नाहीं खाणी चौऱ्याशींची ॥२॥
शुक पराशर मुनि पुंडलीक ।अर्जुन वाल्मीक नाम गाती ॥३॥
बली बिभीषण भीष्म रुक्मांगद ।बकदाल्भ्य शुद्ध महाऋषि ॥४॥
तुका म्हणे यांचीं नामें येतां वाणीं ।प्रत्यक्ष तो प्राणी देवाऐसा ॥५॥

९

गीता भागवत वेद उच्चारितां ।पापाची तों वार्ता कोठें राहे ॥१॥
सकळ वासना नामीं जे रंगली ।साधनें राहिली मग कैंची ॥२॥
म्हणोनिया नेम ऐसा तारी जीवा ।होय तोचि देवा आवडता ॥३॥
उगवला दिवस जाय तो क्षणांत ।विचारूनि हित वेगीं करा ॥४॥
तुका म्हणे स्मरा वेगीं विठोबासी ।न धरा मानसीं दुजें कांहीं ॥५॥

१०

तीर्थांचें जें मूळ व्रतांचें जें फळ ।ब्रह्म तें केवळ पंढरीये ॥१॥
तें आम्हीं देखिलें आपुले नयनीं ।फिटलीं पारणीं लोचनांचीं ॥२॥
जिवींचा जिव्हाळा सुखाचा शेजार ।उभें कटीं कर ठेवूनियां ॥३॥
जगाचा जनिता कृपेचा सागर ।दीनां लोभपर दुष्टां काळ ॥४॥
सुरवरां चिंतनीं मुनिवरां ध्यानीं ।आकार निर्गुणीं तोचि असे ॥५॥
तुका म्हणे नाहीं श्रुती आतुडलें ।आम्हां सांपडलें गीतीं गातां ॥६॥

११

राजस सुकुमार मदनाचा पुतळा ।रविशशिकळा लोपलिया ॥१॥
कस्तुरी मळकट चंदनाची उटी ।रुळे माळ कंठीं वैजयंती ॥२॥

मुकुट कुंडलें श्रीमुख शोभलें । सुखाचें ओतिलें सकळही ॥ ३ ॥
कांसे सोनसळा पांघरे पाटोळा । घननीळ सावळा बाइयांनो ॥ ४ ॥
सकळही तुम्ही व्हा गे एकीसवा । तुका म्हणे जीवा धीर नाहीं ॥ ५ ॥

१२

आवडे हें रूप गोजिरें सगुण । पाहतां लोचन सुखावले ॥ १ ॥
आतां दृष्टीपुढें ऐसाचि तूं राहे । जों मी तुज पाहें पांडुरंगा ॥ २ ॥
लांचावलें मन लागलीसे गोडी । ते जीवें न सोडी ऐसें झालें ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्हीं मागावें लडिवाळी । पुरवावी आळी मायबापें ॥ ४ ॥

१३

शंख चक्र गदा रुळे वैजयंती । कुंडलें तळपती दोन्हीं कानीं ॥ १ ॥
मस्तकीं मुकुट नवरत्नहार । वरी पीतांबर पांघुरला ॥ २ ॥
रत्नहिरेजडित कटीं कडदोरा । रम्य शोभे हिरा बेंबीपाशी ॥ ३ ॥
जडित कंकण कर्णी शोभे मुद्रिका । लाचावला तुका भेटीसाठीं ॥ ४ ॥

१४

नेणें जप तप योग युक्ति ध्यान । करितां चिंतन रात्रंदिवस ॥ १ ॥
नेणें कांहीं देवा झालों उतराई । मागें लागों पाहीं बाळ जैसा ॥ २ ॥
भाव-गंगोदकें आम्ही शुद्ध पाहें । प्रक्षाळिले पाय विटेसहित ॥ ३ ॥
जन्मली जान्हवी ज्या ठायीं उत्तम । हारावया श्रम भाविकांचे ॥ ४ ॥
तुका म्हणे आम्ही झालों पुण्यवंत । सेविलें अमृत रामतीर्थ ॥ ५ ॥

१५

परिमळमिश्रित करूनि उटणें । नारायण तेणें तोषविला ॥ १ ॥
पय घृत दहि मधु ते शर्करा । गोशृंगधारा अखंडित ॥ २ ॥
करोनि संयुक्त ओपियली ईशा । पंचामृतें तैशी पंचविधि ॥ ३ ॥
तुका म्हणे जेथें गंगे जन्म झाला । प्रसाद दिधला आम्हालागी ॥ ४ ॥

१६

आपुलिया घरीं कष्ट तरी करीं । आणोनि घागरी गंगोदक ॥ १ ॥
करोनि विनंती विनवितो तुम्हां । स्नान पुरुषोत्तमा करा वेगीं ॥ २ ॥
उत्तम वस्त्रानें पुसावें तें अंग । करोनि अभ्यंग सर्वांगासी ॥ ३ ॥
परिधान वस्त्रें केलें पीतांबरें । तेणें हें साजिरें रूप दिसे ॥ ४ ॥
तुका म्हणे नेत्र पाहतां निवाले । ध्यान संचारलें हृदयामाजीं ॥ ५ ॥

१७

मन हा मोगरा अर्पूनी ईश्वरा । पुनरपि संसारा येणें नाहीं ॥ १ ॥
मन हें सेवंती अर्पूनी भगवंतीं । पुनरपि संसृती येणें नाहीं ॥ २ ॥
मन हें तुळसी अर्पूनी हृषीकशी । पुनरपि जन्मासी येणे नाहीं ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसा जन्म दिला देवा । तया वास व्हावा वैकुंठासी ॥ ४ ॥

१८

नामपुष्प शुद्ध गळां घाला हार । विवेक सारासार तुरा लावूं ॥ १ ॥
बोध भाळीं बुका क्षमा तुलसीदळ । वाहतां गोपाळ संतोषतो ॥ २ ॥
गाइलीया गुण संतोषें तयानें । करितां कीर्तनें आल्हादे तो ॥ ३ ॥
आल्हादे हा देव कीर्ति वाखाणितां । पवाडे सांगतां याचे यास ॥ ४ ॥
याचे यास करूं सर्व निवेदन । वारील हा शीण संसारींचा ॥ ५ ॥
संसाराचा वारा लागों नेदी अंगा । भावे पांडुरंगा आळवितो ॥ ५ ॥
तुका म्हणे आतां उजळली आरती । भावें तो श्रीपती ओंवाळूंया ॥ ७ ॥

१९

शब्दाचिया भावें केला उपचार । तेणें सर्वेश्वर संतोषला ॥ १ ॥
शब्दाचिया करें करविलें भोजन । धाला नारायण तेणें सुखें ॥ २ ॥
शब्दाचिया करें करविले आचमन । तांबूल अर्पून फळें पुष्पें ॥ ३ ॥
तुका म्हणे अन्नाआधी धूपदीप । उपचार अल्प समर्पिले ॥ ४ ॥

२०

मजलागीं नाहीं ज्ञानाची ती चाड । वाचे घेत गोड नाम तुझें ॥ १ ॥
नेणतें लेकरुं आवडीचें नातें । बोले वचनातें आवडीनें ॥ २ ॥
भक्तिविण कांहीं वैराग्य तें नाहीं । घातला विठाई भार तुज ॥ ३ ॥
तुका म्हणे नाचूं निर्लज्ज होउनी । नाहीं मझे मनीं दुजा भाव ॥ ४ ॥

२१

पूजूं नारायण शब्दाचे सुमनें । मंत्रपुष्प तेणें वाहियेलें ॥ १ ॥
भावाचे पैं हातीं जोडुनी ओंजळ । समर्पिलें जळ शुद्ध भावें ॥ २ ॥
मुखशुद्धी तांबूल दिलें तुळसीदल । आनंद सकळ ओसंडला ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां उरलें नाहीं । नामाविण कांहीं बोलावया ॥ ४ ॥

२२

समाधान चित्ताचें चरणा आलिंगन । पायावरी मन स्थिरावलें ॥ १ ॥
जैसें केलें तैसें घालूं लोटांगणा । करूं प्रदक्षिणा नमस्कार ॥ २ ॥
प्रार्थितों मी तुज राहें माझें पोटीं । हृदयसंपुटीं देवराया ॥ ३ ॥
क्षेम आलिंगन दिली पयीं मिठी । घेतलीसे लुटी अमूप हो ॥ ४ ॥
तुका म्हणे आतां आनंदीआनंद । गाऊं परमानंद मनासंगें ॥ ५ ॥

२३

काय उपचार करूं पांडुरंगा । हेंचि मज सांगा विचारूनी ॥ १ ॥
कोणता पदार्थ उणा तुजपासी । बोलाया वाचेशीं मौन पडे ॥ २ ॥
शंकर-शेषादि करिती स्मरण । तेथें माझें मन गाऊं शके ॥ ३ ॥
इंद्र सुरवर वाहती सुमनें । तेथें म्यां वाहणें काय एक ॥ ४ ॥
परीं आवडीनें जोडूनी ओंजळ । बुका वाहूं माळ तुळसीची ॥ ५ ॥
उणें पुरें तुम्ही करूनियां सांगा । जिवालागीं मग सुख तेव्हां ॥ ६ ॥
तुका म्हणे माझी ऐकावी प्रार्थना । तुम्ही नारायणा सेवकाची ॥ ७ ॥

२४

कैसें करूं ध्यान कैसा पाहूं तुज । वर्म दावी मज याचकासी ॥ १ ॥
कैसी भक्ति करूं सांग तुझी सेवा । कोण्या भावें देवा आतुडसी ॥ २ ॥
कैसी कीर्ति वाणूं कैसा लक्षीं जाणूं । जाणुं हा कवणूं कैसा तुज ॥ ३ ॥
कैसा गाऊं गीतीं कैसा ध्याऊं चित्तीं । कैसी स्थिति मति न कळे मज ॥ ४ ॥
तुका म्हणे जैसें दास केलें देवा । तैसें हें अनुभवा आणीं मज ॥ ५ ॥

२५

काय तुज कैसें जाणावें गा देवा । आणावे अनुभवा कैशापरी ॥ १ ॥
सगुण निर्गुण स्थूल कीं लहान । न कळे अनुमान मज तुझें ॥ २ ॥
कोणता निर्धार करूं हा विचार । भवसिंधु पार तारावया ॥ ३ ॥
तुका म्हणे कैसें पाय आतुडती । न पडे श्रीपती वर्म ठावें ॥ ४ ॥

२६

स्तुती करूं तरी कोण माझी मती । वेदां पडे भ्रांति हें आश्चर्य ॥ १ ॥
परी हा जिव्हाग्रीं रामकृष्णहरी । बैसवीं लौकरी यातीगुण ॥ २ ॥
रूप गुण कीर्ति कृपाळू उदार । वर्णावया पार ब्रह्मा नेणें ॥ ३ ॥
रूपीं नामीं शिव होऊनिया वेडा । वर्णिला पवाडा रामनामीं ॥ ४ ॥
तुका म्हणे मज नेणवेचि शिव । नाहीं राहिला वाव बोलावया ॥ ५ ॥

२७

नामाचा प्रताप न वर्णवेचि मज । सांग गरुडध्वज राहे तेथें ॥ १ ॥
मम वाचा किती परतल्या श्रुती । वेद मुखें श्रुती मौन ठेले ॥ २ ॥

वर्णूं नेणें शेष नामाचा पवडा ।चिरलिया रांडा जिव्हा त्याच्या ॥३॥
अनुसरली रमा वर्णावया श्रीहरी ।पायांची किंकरी होऊनि ठेली ॥४॥
तुका म्हणे आम्ही मानव किंकर ।वर्णावया पार न कळे तुझा ॥५॥

२८

आम्हीं मानवानी वर्णावें तें काय ।सुरवर पाय वंदिताती ॥१॥
गणेश शारदा करिती गायन ।आदिदेव गण श्रेष्ठ श्रेष्ठ ॥२॥
जयाच्या गायना तिष्ठतो शंकर ।तयासी पैं पार न कळे तुझा ॥३॥
तुका म्हणे आम्ही किंकर ते किती ।इंद्राची ती मती नागविली ॥४॥

२९

अगा महाविष्णु अनंत भुजांच्या ।आम्हां अनाथांच्या सोयरीया ॥१॥
न कळे महिमा वेद मौनावती ।तेथें माझी मति कोणीकडे ॥२॥
काय म्यां वर्णावें तुझ्या थोरपणा ।सहस्रवदना शक्ति नव्हे ॥३॥
रविशशी जेथें तेजें सामावती ।तेथें माझी मती कोणीकडे ॥४॥
तुका म्हणे आम्ही बाळ तूं माऊली ।करावी साउली करुणेची ॥५॥

३०

नमो विश्वरूपा अगा मायबाप ।अपारा अमूपा पांडुरंगा ॥१॥
विनवितो रंक दास मी सेवक ।वचन तें एक आइकावे ॥२॥
तुझी स्तुती वेद करितां भागला ।निवांतचि ठेला नेति नेति ॥३॥
ऋशि मुनि बहु सिद्ध कविजन ।वर्णितां तुझे गुण न सरती ॥४॥
तुका म्हणे तेथें काय माझी वाणी ।जे तुझी वाखाणी कीर्ति देवा ॥५॥

३१

विनविजे ऐसे भाग्य नाहीं देवा ।पायांशीं केशवा सलगी केली ॥१॥
धीटपणे पत्र लिहिलें आवडी ।पार नेणें थोडी मति माझी ॥२॥
जेथें वेदां तुझा न कळेचि पार ।तेथें मी अपार काय वानूं ॥३॥
जैसे तैसे माझे बोल अंगिकारी ।बोबड्या उत्तरी गौरवितो ॥४॥
तुका म्हणे विटेवरी जीं पाऊलें ।तेथें म्यां ठेविलें मस्तक हें ॥५॥

३२

त्रिगुण आटीव वाचेचा पसारा ।पडेल विचार सर्व रस ॥१॥
आदि मध्य अंतीं नाहीं अवसान ।जीवनीं जीवन मिळुनी गेलें ॥२॥
रामकृष्ण नाम माळ ही साजिरी ।ओंविली गोजिरी कर्णीं मनी ॥३॥
तुका म्हणे तनु झाली हे शीतल ।आवडी सकळ ब्रह्मानंदें ॥४॥

३३

इतुकें करीं देवा ऐकें वचन ।समूळ अभिमान जाळीं माझा ॥१॥
इतुकें करीं देवा आइकें हे गोष्टी ।सर्व समदृष्टी तुज देखें ॥२॥
इतुकें करीं देवा विनवितों तुज ।संतचरण रज वंदी माथां ॥३॥
इतुकें करी देवा आइकें हे मात ।हृदयीं पंढरीनाथ दिवसरात्रीं ॥४॥
भलतियां भावें तारी पंढरीनाथा ।तुका म्हणे आतां शरण आलों ॥५॥

॥ इति श्रीतुकाराम हरिपाठ समाप्त ॥

---

५ श्रीनिवृत्तिमहाराजकृत हरिपाठाचे अभंग

१

हरिविण दैवत नाहीं पैं अनुचित्तीं ।अखंड श्रीपती नाम वाचे ॥१॥
रामकृष्ण मूर्ति या जपा आवृत्ती ।नित्य नामें तृप्ती जाली आम्हां ॥२॥
नामाचेनि स्मरणें नित्य पैं सुखांत ।दुजीयाची मात नेणो आम्ही ॥३॥
निवृत्ति जपतु अखंड नामावळी ।हृदयकमळीं केशीराज ॥४॥

२

हरिविण चित्तीं न धरीं विपरीत ।तरताती पतित रामनामें ॥१॥
विचारुनी पाहा ग्रंथ हे अवघे ।जेथें तेथें सांग रामनाम ॥२॥
व्यासादिक भले रामनामापाठीं ।नित्यता वैकुंठीं तयां घर ॥३॥
शुकादिक मुनि विरक्त संसारीं ।रामनाम निर्धारीं उच्चारिलें ॥४॥
चोरटा वाल्मीकि रामनामीं रत ।तोही एक तरत रामनामीं ॥५॥
निवृत्ति साचार रामनामी दृढ ।अवघेचि गूढ उगविले ॥६॥

३

हरिमार्ग सार येणेंचि तरिजे ।येरवीं उभिजे संसार रथ ॥१॥
जपतां श्रीहरी मोक्ष नांदे नित्य ।तरेल पैं सत्य हरि नामें ॥२॥
काय हें ओखद नामनामामृत ।हरिनामें तृप्त करी राया ॥३॥
निवृत्ति साचार हरिनाम जपत ।नित्य हृदयांत हरी हरी ॥४॥

४

एकेविण दुजें नाहीं पैं ये सृष्टी ।हें ध्यान किरीटी दिधलें हरी ॥१॥
नित्य या श्रीहरि जनीं पैं भरला ।द्वैताचा अबोला तया घरीं ॥२॥
हरीविणें देवो नाहीं नाहीं जनीं ।अखंड पर्वणी हरी जपतां ॥३॥
निवृत्ति साकार हरिनाम पाठ ।नित्यता वैकुंठ हरिपाठ ॥४॥

५

जपतां कुंटिणी उतरे विमान ।नाम नारायण आलें मुखा ॥१॥
नारायण नाम तारक तें आम्हां ।नेणों पैं महिमा अन्य तत्त्वीं ॥२॥
तरिले पतित नारायण नामें ।उद्धरिले प्रेमें हरिभक्त ॥३॥
निवृत्ति उच्चार नारायण नाम ।दिननिशी प्रेम हरी हरी ॥४॥

६

एक तत्त्व हरि असे पैं सर्वत्र ।ऐसें सर्वत्र शास्त्र बोलियलें ॥१॥
हरिनामें उद्धरे हरिनामें उद्धरें ।वेगीं हरि त्वरें उच्चारी जो ॥२॥
जपता पैं नाम यमकाळ कांपे ।हरी हरी सोपें जपिजे सुखें ॥३॥
निवृत्ति म्हणे हरिनामपाठ जपा ।जन्मांतर खेपा अंतरती ॥४॥

७

गगनींचा घन जातो पैं वारेन ।अवचिता पतन अधोपंथें ॥१॥
अध ऊर्ध्व हरि भाविला दुसरी ।प्रपंचबोहरी आपोआप ॥२॥
निवृत्ति म्हणे जन हरीचें स्वरूप ।कळाचें पैं माप हरिनाम ॥३॥

८

सृष्टीच्या संमता सुरतरु तरु ।बोलिला विस्तारु धर्मशास्त्रीं ॥१॥
नेघों हें तरु प्रपंचपरिवारु ।प्रत्यक्ष ईश्वरू पुरे आम्हा ॥२॥
निवृत्ति निवांत हरीच सेवित ।दो अक्षरीं उचित इंद्रिया ॥३॥

९

सर्वांभूतीं दया शांती पैं निर्धार ।योग साचार जनीं इये ॥१॥
न लगे मुंडण काया हें दंडणें ।अखंड कीर्तन स्मरे हरी ॥२॥
शिव जाणें जीवीं रक्षला चैतन्य ।हे जीवीं कारुण्य सदा भावीं ॥३॥
गगनीं सूर्य तपे अनंत तारा लोपे ।एकची स्वरूपें आत्मा तैसा ॥४॥
उगवला कळीं उल्हासु कमळीं ।तैसा तो मंडली चंद्र लेखा ॥५॥
निवृत्तिमंडळ अमृत सकळ ।घेतलें रसाळ हरिनाम ॥६॥

१०

जयाचेनि सुखें चळत पैं विश्व ।नांदे जगदीश सर्वा घटीं ॥१॥
त्याचें नाम हरी त्याचें नाम हरी ।प्रपंचबोहरी कल्पनेची ॥२॥
शांति त्याची नारी प्रकृति विकारी ।उन्मनी बोवरी हृदयांतु ॥३॥